( रविंद्र बळीराम सावंत विरुध्द वसंत पांडुरंग सावंत व.३)

**नियमित दिवाणी मुकदमा क्र. १८/२०२१ नि. ५३ वरील आदेश**

सदरचा अर्ज वादी यांनी ते हजर करीत असलेले कागदपत्र याकामी हजर करुन ते पुराव्याकामी वाचणेत यावे यासाठी दाखल केलला आहे.

०२. वादीचे कथन असे की, याकामी आजरोजी महत्वाचे कागदपत्र हजर करत आहोत, ती याकामी दाखल करुन घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादींनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. सदरचा अर्ज नामंजुर करण्यात अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले, तसेच उभय पक्षकारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी निशाणी ५४ येथील फेरीस्तासोबत दाखल केलेले कागदपत्र अनुक्रमांक १ पैकी ग्रामपंचायत घावनळे यांनी दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिलेले पत्र हा मुळ दस्तऐवज असून त्यासोबत दाखल केलेले इतर कागदपत्र हे छायांकित प्रती आहेत. तसेच अनुक्रमांक २ येथे सर्व्हे नं. ६७ हि.नं. २९ चे गटबुकाचा कारणापुरता उता–याची सहीसुद नक्कल हजर केलेली आहे. प्रस्तुतचे दस्तऐवज भारतीय पुरावा कायद्यानुसार वादीने शाबीत करणे आवश्यक आहे.

०५. त्यामुळे सदरचे दस्तऐवज हे दाव्याचे कामी अभिलेखावर सामिल करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे सदर दस्तऐवज सामिल करुन घेता येईल. परंतु, सदरील दस्तऐवज शाबीत केल्यानंतर त्यास निशाणी क्रमांक देणे उचित होईल. तसेच भारतीय पुरावा कायद्यात दस्तऐवज संबंधीचे दिलेली गृहितके सदरची कागदपत्रातील मजकूर शाबीत झाला

किंवा कसे हे अंतिम युक्तीवादाचे वेळी विचारात घेता येईल. त्यामुळे सदर दस्तास अभिलेखावर दाखल करुन घेण्याची परवानगी देणे मला उचित वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. ५३ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. नि.५४ च्या फेरीस्तासोबतचे कागपत्र अभिलेखावर हजर करुन घेण्यात येत आहेत.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.04.08 19:02:39 +0530

दिनांक– ०८/०४/२०२४ (प.रा.ढोरे )

ठिकाण– कुडाळ. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ.